| MHWS090004222019 | दाखल दिनांक : १४.०६.२०१९<br>नोंदणी दिनांक : १४.०६.२०१९<br>निकाल दिनांक : ०२.०५.२०२६<br>कालावधी : ०६ व., १०म., १८ दि. |
|---|---|

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, (न्यायालय क्र. २), मानोरा यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारीः श्रीमती तृष्णा गो. बन्सोड)

**नियमित फौजदारी खटला क्र. ४३/२०१९** **निशाणी क्र.– ८४**

गुन्हयाचा तपशिल

गुन्हा क्र. : ४३६/२०१९

पोलीस स्टेशन : मानोरा पोलीस स्टेशन, मानोरा.

| | |
|---|---|
| अभियोगपक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे– पोलीस ठाणे अधिकारी, मानोरा तालुका पोलीस स्टेशन, मानोरा. |
| अभियोगपक्षातर्फे | विशेष सहा. सरकारी अभियोक्ता– श्री. एम. जी. शर्मा |
| आरोपी पक्ष | नंदकिशोर देविसिंग जाधव +१ |
| आरोपी पक्षातर्फे | विद्वान विधीज्ञ श्री. डी. ए. चव्हाण |

**गुन्हयाचा तपशिल**

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | २६/१०/२०१८ |
| प्रथम खबर अहवाल तारीख | २७/१०/२०१८ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | २२/०३/२०१९ |
| दोषारोप निश्चित तारीख | २२/०७/२०१९ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २०/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | –– |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०२/०५/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | –– |

**आरोपीचा तपशिल**

| आ. क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीन तारीख | गुन्हा कलम | निर्दोष सोडले किंवा शिक्षा दिली | शिक्षेचे स्वरुप | जेलमध्ये बंद असलेला कालावधी –कलम ४२८ फौ.प्र.सं. प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.<br><br>२. | **नंदकिशोर देविसिंग जाधव**<br>वय : ३८ वर्ष, धंदाः मजुरी<br>**सौ. प्रमिला किशोर चव्हाण**<br>वय : ४० वर्ष, धंदाः मजुरी<br>दोघे रा. बोरव्हा चिपडे, ता. मानोरा, जि.वाशिम. | कलम ४१(१) सी.आर.पी सी. प्रमाणे समजपत्र दिले. | --<br><br>-- | भा.दं.विचे कलम ३२४, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष सोडले | -- | -- |

## **न्या य नि र्ण य**

(पारित केल्याचा दिनांक ०२/०५/२०२६)

प्रस्तुतचा खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४, ५०४, ५०६ सहकलम ३४ नुसार न्यायप्रविष्ठ आहे.

**सरकार पक्षाची थोडक्यात हकीकत अशी आहे की,**

२. घटना दिनांक २६/१०/२०१८ रोजी सायंकाळी ०७:३० वाजताचे सुमारास ग्राम–बोरव्हा चिपडे, ता. मानोरा जि. वाशिम येथे घडली. सदर दिवशी फिर्यादीचे पती त्यांचे दिर यांना जेवणाकरीता चौकात बोलवण्याकरीता गेले होते. त्यावेळी आरोपीने विनाकारण फिर्यादीचे पतीला शिवीगाळ केली व जीवाने मारण्याची धमकी दिली. त्यावेळी भांडणाचा आवाज आल्याने फिर्यादी तेथे गेली असता आ.क्र.१ चा मुलगा तुषार याने विटेने फिर्यादीचे डोक्यावर डाव्या बाजुने मारहाण केली. तसेच आ.क्र.१ ने फिर्यादीचा भाचा संतोष जाधव यास

काठीने मारहाण केली व आ.क्र.२ ने फिर्यादीला शिवीगाळ केली व जीवे मारण्याची धमकी दिली. त्या अनुषंगाने फिर्यादीने घडलेल्या घटनेबाबत मानोरा पोलिस स्टेशन येथे तक्रार दिली.

३. पोलीसांनी आरोपीं विरुध्द गुन्हा क्र. ४३६/२०१८ प्रमाणे भारतीय दंड संहिताचे कलम ३२४, ५०४, ५०६ सहकलम ३४ अन्वये गुन्हा नोंदविला. तपासिक अंमलदार यांनी घटनास्थळ जप्ती पंचनामा तयार केला, साक्षीदारांचे बयाण नोंदविले, वैद्यकिय प्रमाणपत्र हस्तगत केले व तपासाअंती आरोपींविरुध्द दोषारोप पत्र दाखल केले.

४. आरोपींविरुध्द भा.दं.वि. चे कलम ३२४, ५०४, ५०६ सहकलम ३४ अन्वये नि.क्र.१५ वर दोषारोप निश्चित केले. आरोपींना दोषारोप वाचुन व समजावून सांगितला असता त्यांनी तो अमान्य केला व प्रकरण सुरु ठेवण्याची तयारी दर्शविली. आरोपींची जबानी निशाणी क्र. १६ व १७ वर आहे. सरकारपक्षाने आरोपींविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्यासाठी एकूण तिन साक्षीदार, सा.क्र.१ दिलीप नामदेव आडे (पंच) यांना नि.क्र.४१ वर, सा.क्र.२ अर्चना शंकर राठोड (फिर्यादी/जखमी साक्षीदार) यांना नि.क्र.७२ वर व सा.क्र.३ शंकर बाबुसिंग राठोड (साक्षीदार) यांना नि.क्र.७६ वर तपासले आहे. फिर्यादीतर्फे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी पुढे कुठले ही साक्षीदार तपासायचे नसल्याचे कथन केले. त्या अनुषंगाने आदेश नि.क्र.१ वर पारीत करण्यात आला. आरोपींविरुध्द पुरक पुरावा उपलब्ध नसल्यामुळे त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहिताचे, कलम ३१३(१)(ब) नुसार बयाण नोंदविण्यात आले नाही.

५. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

६. सरकार पक्षाचे हकीकत व आरोपीचा बचाव यावरुन निराकरणासाठी खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष, कारणमीमांसासह खालीलप्रमाणे आहेः–

| क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष हे सिध्द करते काय की दिनांक २६/१०/२०१८ रोजी सायंकाळी ०७:३० वाजताचे सुमारास ग्राम–बोरव्हा चिपडे, ता.मानोरा, जि. वाशिम येथे आरोपींनी आपसी संगणमत करुन फिर्यादी व त्यांचा भाचा यांना विटेने मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत केली व तसे करुन भारतीय दंड संहिताचे कलम ३२४ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | **...नाही** |
| २. | अभियोगपक्ष पुढे असे सिध्द करते काय की, उपरोक्त दिनांक वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसी संगणमत करुन फिर्यादी व त्यांच्या पतीला शांतता भंग करुण अपमान केला व तसे करुन भारतीय दंड संहिताचे कलम ५०४ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | **...नाही** |
| ३. | अभियोगपक्ष पुढे असे सिध्द करते काय की, उपरोक्त दिनांक वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसी संगणमत करुन फौजदारी स्वरुपाचा धाकदपटशा करुन फिर्यादी व त्यांच्या पतीला जीवे मारण्याची धमकी दिली व तसे करुन भारतीय दंड संहिताचे कलम ५०६ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | **...नाही** |
| ४. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## का र ण मि मां सा

**मुद्दे क्रमांक १ ते ३ बाबतः–**

७. वरील मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने चर्चेकरीता एकत्रीत विचारात घेण्यात येत आहे. सा.क्र.२ या प्रकरणातील मुळ फिर्यादी / जखमी साक्षीदार व सा.क्र.३ प्रत्यक्षदर्शी महत्वपुर्ण साक्षीदार असून त्यांनी कथित घटनेविषयी काहीही सांगितले नाही. त्यांनी घटनेची बाब स्पष्टपणे नाकारली आहे. तसेच सा.क्र.१ यांनी त्यांचेसमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार

करण्याची बाब स्पष्टपणे नकारली आहे. फिर्यादी साक्षीदाराने पुढे तक्रार देण्याबाबत सांगितले, परंतु त्यातील मजकूर माहीत नसल्याचे सांगितले. वरील साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य केले नसल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यांचा उलटतपास घेतला. उलटतपासात या साक्षीदाराकडून अभियोगपक्षास अनुकूल अशी कोणतीही बाब अभिलेखावर आली नाही. फिर्यादी साक्षीदाराने त्याचे उलटतपासात आरोपींसोबत न्यायालयाबाहेर आपसी समझोता झाल्याचे मान्य केले. सा.क्र.१ फिर्यादी यांनी घटनेच्या दिवशी आरोपींनी कथित मारहाण केल्याचे तसेच शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिल्याबाबत काहीही कथन केले नाही. सदरील बाब त्यांनी स्पष्टपणे नाकारली आहे. म्हणून त्यांच्या पुराव्यावर विश्वास ठेवता येत नाही. गुन्हयाचे घटक सिध्द करण्याइतपत कोणताही पुरक पुरावा अभिलेखावर आला नाही. अभिलेखावरील पुरावा आरोपींवरील आरोप सिध्द करण्यास पुरेसा नाही. त्यामुळे मुद्दे क्र. १ ते ३ चे निष्कर्ष 'नकारार्थी' देण्यात येत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ४ बाबतः–</u>**

८. अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, फिर्यादीच्या साक्षेस महत्वपुर्ण प्रत्यक्षदर्शी साक्षीदार सा.क्र.३ शंकर व स्थायीक पंच सा.क्र.१ दिलीप यांनी पाठींबा दिलेला नाही. अभियोगपक्षातर्फे महत्वपुर्ण प्रत्यक्षदर्शी साक्षीदार संतोष जाधव त्यांना तपासण्यात आले नाही. अभियोग पक्षास पुरेपुर संधी देवूनही प्रकरणातील इतर महत्वपुर्ण साक्षीदार तसेच वैद्यकिय अधिकारी व तपास अधिकारी यांना पुराव्याकामी हजर करण्यात आलेले नाही. गुन्हयाचे घटक सिध्द करण्याइतपत कोणताही पुरक पुरावा अभिलेखावर आला नाही. अभिलेखावरील पुरावा आरोपीवरील आरोप सिध्द करण्यास पुरेसा नाही. त्यामुळे मुद्दे क्र. ४ बाबत खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## <u>आ दे श</u>

१. आ.क्र.१ **नंदकिशोर देविसिंग जाधव** व आ.क्र.२ **सौ. प्रमिला किशोर चव्हाण** यांना फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २४८(१) नुसार भारतीय दंड संहिताचे कलम ३२४, ५०४, ५०६ सहकलम ३४ अंतर्गत शिक्षेस पात्र अपराध केल्याचे आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपींचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. जप्त मुद्देमाल एक विटेचा तुकडा व काठी मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करण्यात यावा.

४. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७(अ) च्या पुर्ततेकरीता जमानत दाखल करावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by TRUSHNA GOVINDRAO BANSOD
Date: 2026.05.02 17:34:24 +0530

**( तृष्णा गो. बन्सोड)**
दि. ०२/०५/२०२६ न्यायदंडाधिकारी, (प्र.श्रे.)
(न्यायालय क्र.२), मानोरा

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | Smt. R. K. Chavhan (Grade-III) |
| Court | - | (Smt.T.G. Bansod)<br>Jt. CJJD & JMFC, Manora. |
| Date of Judgment/Order | - | 02/05/2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 02/05/2026 |
| Judgment/Order uploaded on | - | 02/05/2026 |